## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे


# हरियाणामुळे महाराष्ट्रात नुकसान?

हरियाणातील विधानसभा निवडणुकीतील निकालांचा अनुकूल परिणाम सत्ताधारी महायुतीवर होईल असे गणित मांडून महाराष्ट्राची निवडणूक लांबणीवर टाकली गेलेली असू शकते. पण आता ती आणखी लांबणीवर टाकलेली बरी असे झाले आहे का?

केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी महाराष्ट्राचा दौरा करून परिस्थितीची पाहणी केली असून राज्यात आता विधानसभा निवडणूक होणार आहे, असे दिसते. पण, महाराष्ट्राची निवडणूक हरियाणाबरोबर का घेतली नाही हे अजूनही कोडेच राहिलेले आहे. देशात एकाच वेळी सर्व राज्यांतील विधानसभा व लोकसभा निवडणूक एकत्र घेण्याचा निर्णय घेतला जाणार असेल तर जम्मू-काश्मीर, हरियाणा, महाराष्ट्र आणि झारखंड या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकत्र घ्यायला कोणाची हरकत होती, असेही विचारता येऊ शकेल. इतक्या प्रचंड मोठ्या देशात एकाच वेळी निवडणूक घेण्याची निवडणूक आयोगाची क्षमता असेल तर चार राज्यांतील विधानसभा निवडणूक एकत्र घेणे आयोगाला फारसे अवघड नसावे. केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. या संस्थेचे अधिकार आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य याबाबत कोणीही काही बोलू शकत नाही. पण, तरीही महाराष्ट्राची निवडणूक हरियाणासमवेत झाली असती तर राजकीयदृष्ट्या तरी काय फरक पडला असता असेही विचारले जाऊ शकते. का,

केंद्रीय निवडणूक आयोगाने जम्मू-काश्मीर व हरियाणाच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना महाराष्ट्र व झारखंड या राज्यांमध्ये नंतर निवडणुका घेतल्या जातील असे सांगितले होते. पण, असे असे विचारून देखील त्यांनी सयुक्तिक कारण दिले नाही. त्यांचे म्हणणे होते की, जम्मू-काश्मीर वगैरे राज्यांत निवडणुका असल्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने अधिक लक्ष द्यावे लागेल हे कारण 'एक देश, एक निवडणूक' धोरणामध्ये कुठे आणि कसे बसते हे माहीत नाही. हे धोरण राबवले जाईल तेव्हा कदाचित देशातील सुरक्षेची परिस्थिती अधिक सुधारलेली असू शकेल वा अन्य पर्याय शोधून काढले जाऊ शकतील. असो. पण, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक लांबणीवर टाकल्यानंतर आता मात्र घाई केली जात असल्याचे दिसते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात पाच फेऱ्यांमध्ये मतदान झाले होते. मग, विधानसभा निवडणूक किती फेऱ्यात घेणार? काही प्रादेशिक पक्षांनी एकाच टप्प्यामध्ये मतदान उरकून टाका असे सांगितलेले आहे. लोकसभा निवडणुकीत सुरक्षा वा अन्य कारणांमुळे मतदानाचे पाच टप्पे झाले तर तेच कारण आता का देता येत नाही? कदाचित एका टप्प्यात मतदान होणार नाही, दोन वा तीन टप्पे होतीलही. मुद्दा असा की, निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये सातत्य का असू शकत नाही असे कोणी विचारू शकेल.

महाराष्ट्राची निवडणूक लांबणीवर टाकण्याला कदाचित राजकीय कारणे असू शकतील अशी शंका घेतली जाऊ शकते. हरियाणातील विधानसभा निवडणुकीतील निकालांचा अनुकूल परिणाम सत्ताधारी महायुतीवर होईल असे गणित मांडले गेले होते का, असाही प्रश्न पडू शकतो. किंवा महायुतीला निवडणुकीच्या तयारीसाठी अधिक वेळ मिळावा असेही असू शकते. पण, गेल्या महिन्याभरातील राज्यातील राजकीय परिस्थिती पाहिली तर जितकी निवडणूक लांबणीवर पडेल तितके सत्ताधारी महायुतीचे अधिक नुकसान होण्याची शक्यता असू शकते. त्यामुळेच आता निवडणुकीची घाई केली जात आहे. राज्यात पक्षांना प्रचारासाठी ४५ दिवसांचा वेळ तरी मिळेल की नाही याबाबत शंका घेतली जाऊ शकते. केंद्रीय निवडणूक आयोगाला २६ नोव्हेंबरच्या आत निकाल लावून नवे सरकार स्थापन होण्यासाठी वेळ द्यावा लागेल. ही घाई करण्यापेक्षा हरियाणाबरोबरच महाराष्ट्राची निवडणूक घेतली असती तर अधिक बरे झाले असते असाही युक्तिवाद करता येऊ शकतो. लोकसभा निवडणुकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रचारासाठी अधिक वेळ मिळावा यादृष्टीने सात टप्प्यांमध्ये मतदान घेतल्याची चर्चा रंगली होती. त्यानंतर चित्र पूर्ण बदललेले आहे.



### आजची चित्रोळी

शल्य नव्हते कपड्यांचे
दु:ख अनवाणी पायांचे !
रमून जायचो खेळामध्यें
सुख मिळायचे स्वर्गीचे !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### ठाकरे गटाचे दसरा मेळाव्याचे ठिकाण ठरलं; ...

दरम्यान, दसरा मेळाव्यासाठी काही महिने आधीच ठाकरे गटाने मैदानाची मागणी करणारे पत्र मुंबई महापालिकेला पाठवले होते. मात्र, महापालिकेने कोणताही निर्णय घेतला नव्हता. मैदानाच्या परवानगीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेने मुंबई महानगर पालिकेला स्मरण पत्र पाठवले होते. अखेर आज ठाकरेंच्या मेळाव्यासाठी मुंबई महानगर पालिकेने शिवाजी पार्क मैदान उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे यंदा छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर ठाकरेंचाच आवाज घुमणार आहे.

### मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान...

याठिकाणी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पथकांना जबाबदारी नेमून देण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी नुकतीच एक बैठक घेऊन काही सूचना केल्या. त्यामध्ये हवामान खात्याने वर्तविलेली पावसाची शक्यता लक्षात घेवून मुख्य सभामंडप, वाहनतळ व्यवस्था, वीज पुरवठा, इंटरनेट सेवा, आरोग्य सेवा यांची पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार याठिकाणी ४० हजारांच्या आसपास नागरिक बसू शकतील, असा भव्य मंडप उभारण्यात आलेला आहे. याठिकाणी एकूण तीन मंडप उभारण्यात आले आहेत. दोन मंडपांच्या ठिकाणी एलईडी स्क्रीन बसविण्यात आलेल्या आहेत.

या कार्यक्रमास सुमारे ४० हजार नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असून ठाणे तसेच ग्रामीण आणि महापालिकांमधून सुमारे १२०० बसगाड्यांची वाहतूक घोडबंदर भागात होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन एक किमीच्या परिघात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मोकळया जागा, मैदाने याठिकाणी ही व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. येथे बसगाड्यांसाठी ७ तर कार आणि दुचाकीसाठी ५ वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था कमी पडल्यास आनंदनगर येथील बस आगार, खासगी शाळा आणि मैदानातही वाहने उभी करण्याची व्यवस्था निर्माण करून ठेवण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या दिवशी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ठाणे वाहतूक पोलिसांनी येथे मोठे वाहतूक बदल लागू केले आहेत.

### वानवडी येथील अत्याचार प्रकरणातील...

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत असे लक्षात आले आहे की, स्थानिक काही नेत्यांनी त्याला पळून जाण्यात मदत केलेली आहे. अशा प्रकारच्या घटनांमध्ये मी काही राजकीय पक्ष वैगरे बघत नाही. आरोपी हा आरोपीच असतो. अशा आरोपीवर कडक कारवाई केली जाईल. तसेच आरोपीला मदत करणाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात येईल, अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या घटनेत आणखी काही पीडित मुली आहेत का? याचाही तपास केला जात आहे. या घटनेची माहिती देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शाळेच्या व्हॅनमध्ये चालकाने मुलींना चुकीच्या पद्धतीने हात लावला. एका मुलीच्या पालकांना हा प्रकार समजल्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली. त्यानंतर आणखी एका मुलीला त्याने अशाच प्रकारे हात लावल्याचे समोर आले आहे. म्हणून त्याच्यावर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संस्थाचालकांनाही याप्रकरणी चौकशीसाठी बोलाविण्यात आले आहे.

या माध्यमातून सर्व संस्था चालकांना आम्ही निर्देश देत आहोत की, त्यांनी त्यांच्या त्यांच्या शाळेतील वाहतूक व्यवस्थेवर अधिक लक्ष द्यावे. चालक आणि इतर कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्याबाबत योग्य माहिती ठेवावी, असेही ते म्हणाले.

पुणे पोलिसांनी संजय जेटींग रेड्डी (वय ४५, रा. वैदुवाडी, हडपसर) नावाच्या आरोपीला अटक केली असून त्याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे. पीडीत मुलगी चार दिवसांपूर्वी शाळेतून घरी आली तेव्हा तिने वडिलांकडे तक्रार केली. वडिलांनी विश्वासात घेऊन मुलीकडे चौकशी केली. तेव्हा विद्यार्थी वाहतूक करणारे संजय अंकल यांनी अश्लील कृत्य केल्याची माहिती दिली. संजय अंकल माझ्याबरोबर असणाऱ्या मैत्रिणीबरोबर अश्लील कृत्य करतात, अशी माहिती तिने वडिलांना दिली.

### १०० रुपयांचा स्टँप बंद ! सर्वसामान्यांना भुर्दंड;...

त्यामध्ये, कोणताही बदल झाला नसल्याचीही माहिती आहे.

कंपन्यांच्या एकत्रीकरण, पुनर्रचना, विलिनीकरण तसेच विभागणीमध्ये विद्यमान किंवा भविष्यातील मतभेद मिटविताना लवादामार्फत लेखी निर्णय दिला जातो. कंपन्यांचे भागभांडवल मोठे असल्याने त्यांच्या स्थावर, जंगम मालमत्तेप्रकरणी अभिहस्तांतरणामध्ये सध्या पाचशे रुपये मुद्रांक शुल्क आकारणी होते. वाढीसाठी पाचशे रुपयांवरून चल व अचल मालमत्तेच्या बाजारमूल्यप्रमाणे दर बदलले जातात. मात्र, सर्वसामान्य नागरिकांना १०० आणि २०० रुपयांच्या स्टँप पेपरवर त्यांचे दस्तावेज तयार करता येत होते. आता, त्यासाठी किमान ५०० रुपयांच्या स्टँपवर दस्तावेजवर बनवावे लागणार आहेत.

### वालावलकर रुग्णालयात २० दिवस बेशुद्ध...

भारत सीरमच्या अँटी स्नेक व्हेनमच्या एकूण ३० कुप्या देण्यात आल्या होत्या. तरीही सुधारणा दिसेना. शेवटी डॉक्टर्स नि सुद्धा आशा सोडली. पण 'देव तारी त्याला कोण मारी' म्हणून दहाव्या दिवशी बाळाने डोळे उघडले. हळूहळू उपचारांना प्रतिसाद देत हात हलवू लागले आणि आपल्या आईला सुद्धा ओळखू लागले. जवळजवळ पाऊण महिना हे बाळ मृत्यू शय्येवर होते. पण बाळाला व्हेंटिलेटर असताना इन्फेक्शन होऊ नये, पाठीला जखमा होऊ नयेत याची पूर्ण जबाबदारी बालरोग तज्ज्ञांनी समर्थपणे पेलली. बाळाचा संपूर्ण खर्च हा महात्मा जोतिबा फुले योजने अंतर्गत पूर्णतः मोफत करण्यात आला. त्यांच्या आई वडिलांनी रुग्णालयाचे शतशः आभार मानले आहेत. रुग्णालयातील बालरोल विभागातील नर्सिंग स्टाफ आणि बालरोग तज्ज्ञ डॉ. गौरी परब, डॉ. प्रचेता गुप्ता, डॉ. मोहित कडू, डॉ. सलोनी शाह, डॉ. पंक्ती मेहता, डॉ. तनीषा सोमकुवर यांनी विशेष सेवा देऊन बाळाचा जीव जीव वाचवला. या बद्दल डेरवण रुग्णालय प्रशासनाचे पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

### नालासोपाऱ्यातील ४१ बेकायदा इमारती पाडणार,...

सध्या भाड्याने राहणाऱ्या लोकांनी घरे रिकामी करून स्थलांतर करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, स्वत:च्या घरात राहणारे घाबरले आहेत. त्यांनी घर रिकामे केले तर त्यांनी आयुष्यभराच्या कमाईने विकत घेतलेले घर त्यांच्या डोळ्यासमोर उद्ध्वस्त होईल. इकडे वीज विभागाला पत्र देऊन दोन दिवसांत इमारतींचा वीज आणि पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, असे महापालिकेचे म्हणणे आहे.

हायकोर्टाने नुकतेच महापालिकेला सर्व इमारती पाडण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने महापालिकेकडून नोव्हेंबरपर्यंत कारवाईचा अहवाल मागवला आहे. पावसाळ्यापूर्वी येथे राहणाऱ्या सुमारे तीन हजार सदनिकाधारकांना महापालिकेने नोटिसा देण्यास सुरुवात केली. यामुळे लोक घाबरू लागले. घर वाचवण्यासाठी रहिवाशांनी रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. लोक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही गेले. त्याला सगळीकडून केवळ आश्वासने मिळाली. मात्र, पावसाळ्यात कोणालाही बेघर केले जाणार नाही, असे महापालिका आयुक्त अनिल कुमार यांनी सांगितले होते, त्यामुळे ३० सप्टेंबरपर्यंत कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असे आश्वासन देण्यात आले.

आता महापालिकेने फ्लॅट लवकरात लवकर रिकामे करावेत, असा सूचना फलक लावला आहे. तेव्हापासून लोकांची रात्र निद्रानाश आहे. दोन दिवसांपूर्वी काही लोकांनी आझाद मैदानात जाऊन आंदोलनही केले होते. खासदार सुप्रिया सुळे यांचीही भेट घेतली. सुळे यांनी कारवाई थांबवण्याचे आश्वासन दिले आहे. रहिवाशांचे एक पथक सर्वोच्च न्यायालयात स्थगितीसाठी गेल्याचे सूत्रांकडून समजते. येथे त्यांना पुन्हा नोटीस देण्याचे काम सुरू झाल्याचे महापालिकेच्या विभाग-डचे सहायक आयुक्त मोहन संखे यांनी सांगितले. वीज आणि पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

### बेशरम लोकांचा समाज म्हणजे हिंदुस्थान !...

तसाच नारा हिंदू-मुस्लिम एकतेचा दिला जातो.

आपले कोण, परके कोण, शत्रू अन् मित्र, वैरी अन् कैवारी कोण हे न कळणारी आपली हिंदू जमात आहे.

शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला जगाचा बाप व्हायचा मार्ग शिकवलाय.. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या विचारांवर आपण देश उभा केला आहे. त्यामुळे लढण्याचे बळ मिळो, हीच प्रार्थना.काही माता-भगिनींनी एकत्र येऊन यापुढे स्वतंत्र दुर्गामाता दौड काढावी. सण, उत्सवात चांगल्या प्रथा महिलांनी सुरु कराव्यात. पोलिसांनी गुराख्यासारखं दौडीसोबत येऊ नये. त्यांनीही डोक्यावर टोपी घालावी. त्यांनीही पळायला हवे, असे भिडे यांनी केले. राजकारण, सत्ताकारण, अर्थकारण शूद्र आहे. हे थुंकण्याच्या लायकीचे सुद्धा विषय नाहीत. शिवाजी महाराजांच्या विचारांचा भारत करण्यासाठी आपल्याला प्रयत्न केले पाहिजेत, असे मत भिडे यांनी मांडले.

# डान्सिंग स्टार मिथुनदांचा गौरव .....



हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा कला क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या अभिनय कलेचा गौरव आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी जवळपास पाच दशके चित्रपट सृष्टीत व्यतीत केले असून हिंदी, बंगाली सह अनेक भाषेत अभिनय केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत डान्सिंग स्टार म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म १६ जून १९५० रोजी झाला. बी एस सी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. अभिनयाचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी मृगया या बंगाली चित्रपटात अभिनय केला. मृगया या त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे देशभर नाव झाले. त्यांनीही मग हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबई गाठली मात्र इथे त्यांना सहजासहजी चित्रपट मिळाले नाही. त्यांनाही चित्रपटात भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९८२ साली आलेल्या डिस्को डान्सर हा त्यांचा तसा गाजलेला पहिला हिंदी चित्रपट. या चित्रपटाने त्यांना डान्सिंग स्टार बनवले पुढे हीच ओळख त्यांची कायम राहिली. त्यांनीही ही ओळख जपण्याचा प्रयत्न करत अनेक चित्रपटात अप्रतिम नृत्यकला सादर केली. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट हिट होत गेले. विशेषतः ८० च्या दशकात त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. सुरक्षा, तराणा, हम पांच, शौकीन, वारदात, डिस्को डान्सर, प्यार झुकता नही, डान्स डान्स असे त्यांचे अनेक चित्रपट हिट झाले. तो काळ सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेले अनेक चित्रपट त्यांना मिळाले आणि त्यांनी त्यांचे सोने केले. त्यांच्याकडे चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्यांची रांग लागू लागली म्हणूनच त्यांना गरीब दिग्दर्शकांचा अमिताभ असे म्हंटले जाऊ लागले.

१९९० साली त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतच अग्निपथ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे ही त्यांनी सोने केले. अमिताभ बच्चन यांच्यासमोर त्यांनी सशक्त अभिनय करून वाहवा मिळवली. ९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या भूमिका केल्या मात्र ९० च्या उत्तरार्धात त्यांनी मिळेल त्या भूमिका स्वीकारल्या त्यामुळे त्यांचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले. समीक्षकांनी त्यांना धारेवर धरले पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उतार वयात मात्र ते चरित्र भूमिकांकडे वळले. वीर, गोलमाल ३, हाऊसफुल्ल २, ओह माय गॉड, खिलाडी ७८६, कांची, किक अशा चित्रपटातून त्यांनी चरित्र भूमिका साकारल्या. या भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. छोट्या पडद्यावरील डान्स इंडिया डान्स या नृत्यावर आधारित कार्यक्रमात त्यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांना तीन राष्ट्रीय, दोन फिल्मफेअर, दोन स्टार डस्ट व एक स्क्रीन अवॉर्ड मिळाला. आता त्यांना दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव झाला असे म्हणावे लागेल. अर्थात त्यांना मिळालेल्या या पुरस्कारावरही काहींनी आक्षेप घेतला आहे. मिथुन चक्रवर्ती हे सत्ताधारी पक्षाचे समर्थक असल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेला असा आक्षेप घेतला जात आहे. अर्थात आक्षेप घेणारेही त्यांच्या अभिनय कलेचे प्रशंसक आहेत हे देखील तितकेच खरे आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचे मनापासून अभिनंदन!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# अटल सेतूवरून उडी घेत ५२ वर्षीय व्यावसायिकाची आत्महत्या; तीन दिवसांत दुसरी घटना



**मुंबई (यश सावंत) :** मुंबईतील एका मोठ्या बँकेतील उपव्यवस्थापक सुशांत चक्रवर्ती (४०) यांनी सोमवारी (३० सप्टेंबर) अटल सेतूवर मोटरगाडी थांबवून समुद्रात उडी मारली. त्यांचा मृतदेह मंगळवारी नवी मुंबीतील जेएनपीटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडला. मृतदेहाची ओळख पटली असून नवी मुंबई पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून हे प्रकरण शिवडी पोलिसांकडे वर्ग केलं आहे. दरम्यान, बुधवारी पुन्हा एकदा अटल सेतूवर अशीच एक घटना घडली आहे. मुबई व नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल सेतूवरून समुद्रात उडी घेत एका ५२ वर्षीय व्यावसायिकाने आत्महत्या केली आहे. तीन दिवसांतली ही दुसरी घटना आहे.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने या घटनेची माहिती देताना सांगितलं की, बुधवारी सकाळी अटल सेतूवरून उडी मारून व्यावसायिक फिलीप शाह यांनी आत्महत्या केली आहे. माटुंगा येथील रहिवासी असलेल्या शाह हे त्यांची सेडान कार घेऊन अटल सेतूवर गेले होते. त्यांनी त्यांची कार रस्त्याच्या बाजूला लावली आणि समुद्रात उडी घेत आत्महत्या केली.

**आत्महत्येचं कारण काय?**

पोलिसांनी सांगितलं की पूलावरील सीसीटीव्ही नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांनी एक कार उभी असलेली पाहिली. त्यानंतर त्यांनी बचाव पथकाशी संपर्क साधला. नियंत्रण कक्षातील कर्मचारी व बचाव पथक कारजवळ पोहोचलं. जिथून शाह यांनी समुद्रात उडी घेतली त्याच भागात शोधमोहिम हाती घेण्यात आली. बचाव पथकातील कर्मचाऱ्यांनी देखील समुद्रात उडी घेत शोध सुरू केला. तसेच एक बोट देखील समुद्रात नेण्यात आली. काही तासांच्या शोधमोहिमेनंतर बचाव पथकाने शाह यांना समुद्रातून बाहेर काढलं आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र डॉक्टरांनी सांगितलं बऱ्याच वेळापूर्वी त्यांचा मृत्यू झाला आहे.

शाह यांच्याकडील आधार कार्डद्वारे त्यांची ओळख पटली. पोलिसांनी या आत्महत्या प्रकरणाचा प्राथमिक तपास करून सांगितलं की शाह हे गेल्या काही दिवसांपासून खूप तणावात होते. यातूनच त्यांनी टोकाचं पाऊल उचललं असावं. दरम्यान, नवी मुंबईतील न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**बँक मॅनेजरची अटल सेतूवरून उडी घेत आत्महत्या**

दोन दिवसांपूर्वी एका बँकेतील उपव्यवस्थापक सुशांत चक्रवर्ती (४०) यांनी अटल सेतूवरून उडी घेत आत्महत्या केली होती. सुशांत चक्रवर्ती यांनी अटल सेतवरून उडी मारल्याची माहिती शिवडी पोलिसांना मिळाली. शिवडी पोलिसांनी तपासणी केली असता अटल सेतूवरून समुद्रात उडी मारणाऱ्या व्यक्तीची लाल रंगाची मोटारगाडी (ब्रेजा) घटनास्थळी आढळली. ही मोटरगाडी सुशांत चक्रवर्ती यांची असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. चक्रवर्ती परळ येथे पत्नी व मुलीबरोबर वास्तव्यास होते व फोर्ट परिसरातील हुतात्मा चौक येथील बँकेत उपव्यवस्थापक पदावर कार्यरत होते. पोलिसांनी तात्काळ चक्रवर्ती यांच्या पत्नीला पोलीस ठाण्यात बोलावले आणि पतीबाबत माहिती घेतली. गेल्या काही दिवसांपासून चक्रवर्ती कामाच्या तणावाखाली होते, असे त्यांच्या पत्नीने पोलिसांना सांगितले. चक्रवर्ती पत्नी व मुलीला शनिवारी लोणावळा येथे घेऊन गेले होते. तेथून परत आल्यानंतर सोमवारी सकाळी कामाला जात असल्याचे सांगून चक्रवर्ती घरातून बाहेर पडले. पण ते बँकेत न जाता शिवडी पोलिसांच्या हद्दीतील अटलसेतूवर गेले आणि त्यांनी तेथून समुद्रात उडी मारली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# महायुतीत जागा वाटपात नाराजी नाही, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

**ठाणे (सूचित शिंदे) :** महायुतीमध्ये जागावाटपाबाबत कोणतीही नाराजी नाही. महायुतीत जागावाटप हे समन्वयाने होत आहे. महायुती अधिक मजबूत आणि घट्ट होऊन निवडणुकीला सामोरे जात असून यंदाची निवडणुकीत आम्हीच जिंकणार आहोत, असा दावा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला. ठाणे आणि शिवसेना, ठाणे आणि महायुती, बाळासाहेब आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे गुरुशिष्याचे प्रेम असे समीकरण असलेल्या ठाण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी येताहेत, हे ठाणेकरांचं भाग्य असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांनी टेंभीनाक्यावर नवरात्रोत्सव सुरू केला. त्यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा उत्सव पुढे सुरू ठेवला आहे. या देवीच्या आगमन मिरवणुकीत मुख्यमंत्री शिंदे हे सहभागी होतात. यंदाही ते या मिरवणुकीत सहभागी झाले होते. त्यादरम्यान त्यांनी पत्रकारांशी बोलताना उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. लाडकी बहिण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी, लाडका कामगार अशा सर्वच स्तरातील नागरिकांसाठी



कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षात केलली कामे तर, महायुतीने सव्वा दोन वर्षात केलेली कामे यांचे मुल्यमान नागरिकांनीच करायला हवे. तसेच मला विश्वास आहे की, आमच्या कामाची पोचवापती या महाराष्ट्राची जनता देईल आणि महायुतीच सरकार बहुमताने येईल, अशा दावाही त्यांनी केला.

बाळासाहेब ठाकरे असताना सर्वजण मातोश्रीवर येत होते. पण, आता त्यांचा वारस असल्याचे सांगणारे मुख्यमंत्री पदाकरीता नाव घेण्यासाठी दिल्लीच्या गलोगल्ली फिरत आहेत. अशी त्यांच्यावर केवीळवाणी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच बाळासाहेबांनी कधीच ज्या लोकांना उभे केले नाही. त्यांच्यासोबतही त्यांनी घरोबा केला आहे. तसेच ते लोक पाकिस्तानची भाषा बोलू लागले आहे. परंतू शिवसेनेचा मूळ मतदार मात्र धनुष्यबानासोबत जोडला गेला आहे. हे लोकसभेच्या निवडणूकीच सिद्ध झालेले आहे, असेही ते म्हणाले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात महिलांना इज्जत नव्हती. शेतकऱ्यांना मदत मिळत नव्हती. या राज्याचा विकास बंद होता. या राज्याचे प्रकल्प बंद केले होते. अशा आसुरांचा नि:पात देवीकडून होईल, अशी टीकाही त्यांनी केली. सावरकर आणि हिंदुत्व यांच्या बद्दल बोलण्याच अधिकार त्यांना नाही. कारण ज्या दिवशी त्यांनी आघाडी केली, काँग्रेसबरोबर घरोबा केला. त्याच दिवशी हिंदुत्वाचा धागा तुटला. बाळासाहेबांचे विचार त्यांनी सोडले. त्यामुळे ते काही बोलूच शकत नाही, अशी टीकाही त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

## थोडक्यात



### ऋतुजा देगलूरकरने कराटे स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

**कल्याण ( विशाल पाटील ) :** नुकत्याच नवी मुंबई येथे झालेल्या उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे अखिल भारतीय खुली कराटे अजिंक्य स्पर्धेत सब ज्युनिअर या गटातून ऋतुजा देगलूरकर हिने सुवर्णपदक पटकावले असून ही ११ वर्षाखालील गटात खेळली आहे. त्यानंतर अनुप यादव याने ११ वर्षाखालील गटात कांस्यपदक तर लकी नायडू याने रौप्य पदक १० वर्षाखालील गटात पटकावले आहे.

सर्व विद्यार्थी कल्याण येथील नारायणा टेक्नो स्कूलमध्ये शिकत असून यांचे प्रशिक्षक विवेक शुक्ला यांनी अतिशय मेहनतीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आई-वडील यांच्या मेहनतीनंतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी प्रेरित करून प्रोत्साहन दिले त्यानंतरच हे तीनही विद्यार्थी इथपर्यंत पोहोचले आहेत.

### मेरा युवा भारत अंतर्गत महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता ही सेवा कार्यक्रमाचे आयोजन



**कल्याण ( गणेश बागडे ) :** नेहरू युवा केंद्र ठाणे द्वारे मेरा युवा भारत उपक्रम अंतर्गत महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता ही सेवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ३ महाविद्यालयांमधून एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हा उपक्रम एनएसएस युनिट - अचिव्हर्स कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट कल्याण, बी. के. बिर्ला नाईट कॉलेज आणि मोहींदर सिंग काबल सिंग डिग्री कॉलेज, सोलेस इंडिया आणि शिवरत्न फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. कल्याण पश्चिमेतील काळा तलाव आणि खडकपाडा परिसरात हि स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या प्रसंगी अचिव्हर्स कॉलेजचे संस्थापक प्राचार्य, सी.ए. डॉ. महेश भिवंडीकर, एनएसएस कार्यक्रम अधिकारी राजेश कुमार यादव, केडीएमसी ब्रँड ॲम्बेसेडर व माजी पोलीस उपायुक्त, पंजाब पोलीस, डॉ. रुपिंदर कौर मुरजानी, एनएसएस कार्यक्रम अधिकारी शशिकांत तिवारी (एमके कॉलेज), प्रणित कासरे (बिर्ला नाईट कॉलेज), स्वप्नील जाधव, निमित शाह, मयूर सुर्वे, यश पाटील, शिवरत्न फाऊंडेशनचे रत्नेश महाडिक उपस्थित होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना नेहरू युवा केंद्र कडून सहभगी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. स्वच्छता अभियाना द्वारे गांधीजींच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये स्वच्छते बाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी परिसरातील नागरिकांनीही या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे एकत्रितपणे स्वच्छ आणि सुंदर शहराची कल्पना पुढे नेण्यात आली.

# संत निरंकारी मिशन मार्फत महात्मा गांधी जयंती दिनी राबविले स्वच्छता अभियान

**कल्याण (आकाश कांबळे) :** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियानासह अनेकानेक सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या संत निरंकारी मिशनच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर रोजी कित्येक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका सामान्य रुग्णालय, वाशी, नवी मुंबई याची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानात संत निरंकारी सेवादल व अन्य भाविक भक्त मिळून सुमारे 165 निरंकारी भक्तांनी भाग घेतला.



महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.अजय गडदे, मेडिकल ऑफिसर प्रशांत जावडे आणि मेडिकल सोशल वर्कर सरिता खेरवासिया यांनी हे अभियान राबविण्यासाठी अत्यंत मोलाचे सहकार्य केले. पालिकेचे स्वच्छता निरीक्षक विरेंद्र पवार यांनी अभियाना दरम्यान उपस्थित राहून स्वयंसेवकांचे उत्तम मार्गदर्शन केले. मिशनच्या स्थानिक शाखेचे मुखी अनिल शिंदे आणि सेवादल संचालिका पूजा पिंगळे यांच्या नियोजनानुसार व देखरेखीखाली हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले. तर संत निरंकारी मिशनच्या जसखार (उरण) शाखेमार्फत जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय, वहाळ, उलवे नोड येथेही महात्मा गांधी जयंती दिनी स्वच्छता अभियान राबवून शाळा आणि परिसर चकाचक करण्यात आला. या अभियानामध्ये संत निरंकारी सेवादलाच्या महिला व पुरुष स्वयंसेवक मिळून सुमारे १५० निरंकारी भक्तांनी आपल्या सेवा मोठ्या तन्मयतेने अर्पण केल्या.

भारतीय रेल्वेच्या स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमा अंतर्गत संत निरंकारी मिशन मार्फत मुंबईच्या भायखळा रेल्वे स्टेशनच्या आत व बाहेरील परिसरात व्यापक स्वच्छता अभियान आणि स्वच्छतेच्या प्रति जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ संत निरंकारी मिशनच्या प्रचार प्रसार विभागाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक डॉ.दर्शन सिंह आणि सेवादलचे क्षेत्रीय संचालक ललीत दळवी यांच्या सान्निध्यात सद्गुरु चरणी प्रार्थना करुन करण्यात आला. मुंबई सेवादल क्षेत्र IV चे क्षेत्रीय संचालक शंकर सोनावणे यांच्या देखरेखीखाली मिशनच्या डिलाईल रोड, वरळी आणि लोअर परळ शाखांतील सेवादल स्वयंसेवक तसेच अन्य निरंकारी भक्तांनी मिळून सुमारे 140 स्वयंसेवकांनी या अभियानात भाग घेतला. या स्वच्छता अभियाना अंतर्गत चालविण्यात आलेल्या जनजागृती अभियानामध्ये मिशनच्या शिवडी युनिटच्या 16 सेवादल सदस्यांनी अत्यंत प्रभावशाली रूपात पथनाट्य सादर करुन स्वच्छतेविषयी बहुमूल्य संदेश प्रसारित केला ज्याचे उपस्थित जनसामान्यांनी कौतुक केले. या अभियाना दरम्यान मिशनचे प्रबंधक आणि रेलवे अधिकाऱ्यांसह अभियानामध्ये सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांनी स्वच्छतेविषयी प्रतिज्ञाही घेतली. अभियानात उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांमध्ये आर.के.मोदी (सिनियर डीओएम), गणेश स्वैन (स्टेशन मैनेजर), उपेंद्रसिंह डगर (सिनियर आयपीएफ), अश्वनी सिंह (क्लिलीनेस) आणि विविध गुप्ता (डीवायएसएन) यांचा समावेश होता. स्थानीय आमदार यामिनी जाधव यांनी या अभियानाला सदिच्छा भेट दिली आणि संत निरंकारी मिशन मार्फत मानवतेच्या प्रति केल्या जात असलेल्या निष्काम सेवांची स्तुती केली.

# द्रोणागिरी परिसर खड्ड्यांत; पाऊस थांबल्याने मार्गावरील धुळीच्या उधळणीने प्रवासी आणि नागरिक त्रस्त



**उरण (भावना जैन) :** येथील द्रोणागिरी नोडमधील पावसाळयात झालेल्या खड्ड्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. याचा फटका नागरिक आणि वाहनचालकांना बसत आहे. द्रोणागिरी नोडमधील नवघर ते खोपटे दरम्यानच्या मार्गाला भेंडखळ पेट्रोल पंप, खोपटे पूल चारफाटा आदी ठिकाणच्या मार्गाला मोठमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गावरून सातत्याने अवजड कंटेनर वाहने ये-जा करीत आहेत. या भल्या मोठ्या खड्ड्यात कंटेनर वाहन कोसळून अपघात होण्याची शक्यता आहे. याच परिसरात यापूर्वी दुचाकी तसेच एसटी बसला अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

अशाच प्रकारचे खड्डे नवघर उड्डाण पुलावरही पडले आहेत. या पुलावरून प्रवासी वाहने व विद्यार्थी प्रवास करीत आहेत. त्यातच गेल्या दोन दिवसांपासून उरण परिसरातील पाऊस थांबला आहे. त्यामुळे रस्ते कोरडे झाले आहेत. द्रोणागिरी व उरण पनवेल मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात आलेल्या खडीमुळे धूळ निर्माण होऊ लागल्याने प्रवासी आणि नागरिकांना धुळीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिक आणि प्रवासी त्रस्त झाले आहेत. उरण पनवेल मार्गावरील वाहनात प्रचंड वाढ झाली आहे. सातत्याने सुरू असलेल्या वाहनांमुळे पावसाळयात रस्त्याला झालेले खडे बुजविण्यासाठी टाकण्यात आलेली खडी उखडून पडू लागली आहे. त्यातून धूळ तयार होत आहे. ही धूळ वाहनांमुळे वातावरणात पसरू लागली आहे. या धुळीमुळे समोरचे वाहन आणि व्यक्ती दिसत नाही. या परिसरात उघड्यावर काम करणाऱ्या मजुरांच्या व वाहनचालकांच्या पोटात दररोज मूठभर धुरळा जात असल्याची शक्यता पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

तसेच त्यामुळे नागरिकांना अनेक प्रकारच्या श्वसनाचे आजारही बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्गावरील ही धूळ कमी करण्यासाठी सिडको तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते महेश घरत यांनी केली आहे.

# डोंबिवलीतील मोठागाव रेल्वे फाटकावरील पुलाच्या पोहच रस्त्याने बाधितांच्या पुनर्वसनासाठी ८४ कोटींचा प्रस्ताव

**कल्याण (विवेक गुंजाळ) –** डोंबिवलीतील मोठागाव रेतीबंदर रेल्वे फाटकावर रेल्वेकडून बांधण्यात येणाऱ्या उड्डाण पुलाच्या पोहच रस्त्याने बाधित होणाऱ्या रेल्वे मार्गिकेच्या दुतर्फाच्या बाधितांच्या जमिनीचे भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना कामासाठी महसूल विभागाने योग्य मुल्यांकन करून ८४ कोटी १२ लाख ६८ हजार ५८८ रुपयांचा प्रारूप प्रस्ताव तयार केला आहे. महसूल विभाग आणि रेल्वे बोर्डाने हे प्रस्ताव अंतीम केल्यानंतर रस्ते बाधितांना मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

माणकोली उड्डाण पुलाकडून डोंबिवलीत येण्यासाठी मोठागाव स्मशानभूमी ते रेतीबंदर रेल्वे भागात पोहच रस्ता आणि रेतीबंदर रेल्वे फाटकावर उड्डाण पुलाचे काम प्रस्तावित आहे. रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल बांधणीचे काम समर्पित जलदगती मालवाहू रेल्वे मंडळाकडून (डीएफसीसी) केले जाणार आहे. रेतीबंदर रेल्वे फाटकावर उड्डाण पुलाची उभारणी झाल्यानंतर पुलाच्या पूर्व आणि पश्चिम दिशेला पुलाचे पोहच उतार रस्ते असणार



आहेत. या पोहच रस्त्यांच्या मार्गिकेत इमारती, व्यापारी गाळे, चाळी आहेत. या बाधितांना शासकीय मुल्यांकनाप्रमाणे भरपाई मिळाल्यानंतर त्यांच्या जमिनीचे भूसंपादन, त्यांची बांधकामे हटविणे पालिका प्रशासनाला शक्य होणार आहे.

कल्याण डोंबिवली पालिकेने रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजुच्या पोहच रस्त्यांसाठी भूसंपादन, त्या जमिनीचे मुल्यांकन याविषयी महसूल विभागाला कळविले आहे. महसूल विभागाने या भागातील काही जमिनीचे भुसंपादन केले आहे. अद्याप काही जमिनी, बांधकामे यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मुल्यांकन होणे बाकी आहे, असे महसूल विभागातील एका उच्चपदस्थाने सांगितले.

रेतीबंदर रेल्वे फाटकावरील पुलाच्या पोहच रस्त्यावरील बाधित बांधकामे, भूसंपादन, बाधितांची पुनर्स्थापना या सर्व प्रक्रियांसाठी महसूल विभागाने भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ मधील कलम २३ अन्वये प्रारूप आराखडा तयार केला आहे. या आराखड्याप्रमाणे मौज नवागाव या महसुली हद्दीतील भूसंपादन, पुनर्वसन कामासाठी दोन कोटी ९२ लाख ५० हजार ५६० रुपये, मौजे ठाकुर्ली येथील भूसंपादन कामासाठी ८१ कोटी २० लाख १८ हजार २८ रूपये प्रस्तावित करण्यात आले आहेत.

# डोंबिवलीत डीएनसी शाळा भागात नवरात्रोत्सव मंडळांकडून डेरेदार झाडांवर विद्युत रोषणाई

**डोंबिवली ( प्रथमेश चव्हाण)** – डोंबिवली पूर्व भागातील सुनीलनगर भागातील ध. ना. चौधरी भागातील रस्त्यांवरील झाडांवर या भागातील नवरात्रोत्सव मंडळांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाकडे आणि कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या न घेता विद्युत रोषणाई केली आहे. अशाप्रकारची रोषणाई करण्यास उच्च न्यायालयाने प्रतिबंध केला आहे. तरीही स्थानिक नवरात्रोत्सव मंडळांनी अशाप्रकारची झाडांवर विद्युत रोषणाई करून झाडांना हानी पोहचविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पर्यावरणप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नवरात्रोत्सवनिमित्त सुनीलनगरमधील ध. ना. चौधरी





विद्यालयाचा परिसर विद्युत रोषणाईने सुशोभित करण्यात आला आहे. ही रोषणाई करताना मुंबई उच्च न्यायलयाचे प्रतिबंधात्मक आदेश आहेत. हे माहीत असूनही नवरात्रोत्सव मंडळ आणि मंडप डेकोरेटर्सने अशाप्रकारची रोषणाई केल्याने स्थानिक रहिवासी, पर्यावरणप्रेमी मंडळी नाराजी व्यक्त करत आहेत. चौधरी विद्यालय परिसरात जुनाट डेरेदार वृक्ष आहेत. विविध प्रकारचे पक्षी, कीटक, जैवविविधता या झाडांवर आहे. पक्ष्यांची या भागातील झाडे ही रात्रीची निवासस्थाने आहेत. या झाडांवर रोषणाई केल्याने त्यांच्या अस्तित्व आणि अधिवासाला नवरात्रोत्सव मंडळांनी धक्का पोहचविला आहे, अशा तक्रारी पर्यावरणप्रेमींनी केल्या.

ाडे हा एक जीव आहे. विविध प्रकारची जैवविविधता या झाडांच्या आधाराने राहत असते. त्यामुळे झाडांना विद्युत रोषणाई करून कोणालाही इजा करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे कोणीही ढाबा, हॉटेल चालक, सभा मंडपवाले झाडांना विद्युत रोषणाई करत असतील तर त्यांनी ती स्वत:हून काढून टाकण्याचे आणि स्थानिक संबंधित पालिकांनी आपल्या हद्दीतील एकाही झाडांवर विद्युत रोषणाई केली जाणार नाही यादृष्टीने दक्षता घेण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. गेल्या जुलै ते ऑगस्ट या कालावधीत मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रातील सर्व महापालिकांनी झाडांवर व्यावयासिकांनी केलेली रोषणाई काढून टाकण्याचे आदेश दिले होते. या आदेशाप्रमाणे कल्याण डोंबिवली पालिकेने आपल्या हद्दीतील झाडे विद्युत रोषणाई मुक्त केली होती.

डोंबिवलीतील सुनीलनगर भागात नवरात्रोत्सव मंडळांनी कल्याण डोंबिवली पालिकेला अंधारात ठेऊन, उच्च न्यायालयाच्या आदेशांना न जुमानता डौलदार वृक्षांवर विद्युत रोषणाई केल्याने संबंधित नवरात्रोत्सव मंडळ आणि विद्युत रोषणाई करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

# बदलापूर अत्याचार प्रकरणात आरोपी संचालकांना न्यायलयाने एका प्रकरणात दिला जामीन तर दुसऱ्या प्रकरणात पोलीस कोठडी

**कल्याण (गणेश बागडे ) :** बदलापूर मधील शाळेत शिकणाऱ्या दोघा चिमुरड्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती दडपणारे फरारी शाळेचे संचालक तुषार आपटे व उदय कोतवाल या दोघा आरोपींना ठाणे गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी अटक करून कल्याण न्यायलाया समोर हजार केले असता न्यायालयाने दोघा आरोपींना एका गुन्ह्यात जामीन दिला तर दुसऱ्या गुन्ह्यात पोलीस कोठडी सुनावली. बदलापूर मधील दोघा चिमुरडीवर नराधम अक्षय शिंदे याने अत्याचार केला होता. या घटनेची माहिती असूनही तुषार आपटे व उदय कोतवाल या दोघा शाळेच्या संचालकांनी दडवून ठेवल्याची माहिती उजेडात येताच दोघा संचालकानी पळ काढीत गेल्या दीड महिन्या पासून फरार झाले होते. दरम्यान या दोघा फरार संचालकांनी न्यायालयात अटक पूर्व जामिनासाठी अर्ज केला होता न्यायलयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता. या दोघा फरार आरोपीचा पोलीस कसून तपास करीत होते अखेरीस ठाणे गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी बुधवारी रात्री दोघा फरार संचालक आरोपींना अटक करीत गुरुवारी



दुपारी कल्याण न्यायालया समोर हजार केले. सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार न्यायालयात, गुन्हे शाखेने सरकारी वकील अश्विनी भामरे पाटील यांच्यामार्फत दोन्ही आरोपींच्या पोलिस कोठडीची मागणी केली. पाटील यांनी युक्तिवाद केला की, अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना कळल्यानंतरही शाळेचे अध्यक्ष व सचिवांनी पोलिसांना माहिती दिली नाही. घटनेच्या दिवशी शाळेतील सीसीटीव्ही बंद होते आणि याचा तपास करण्यासाठी त्यांनी आरोपींची चौकशी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

# भारतात होणार पहिला खो-खो वर्ल्डकप!

**खो-खो खेळाला सोनेरी दिवस येणार आहेत. भारतीय खो-खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाने २०२५ खो-खो वर्ल्डकप स्पर्धेची घोषणा केली आहे. या स्पर्धेचे आयोजन भारतात केले जाणार आहे. या स्पर्धेत ६ महाद्वीपातील २४ देशांचा सहभाग असणार आहे. ज्यात १६ महिला आणि १६ पुरुष संघांचा समावेश असणार आहे.**




शाळत असताना प्रत्यकान एकदातरी खो-खो हा खेळ खेळला असेल. मातीवरचा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो. भारतात या खेळाची क्रेझ नेक्स्ट लेव्हलला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय महिला आणि पुरुष संघांचा दबदबा पाहायला मिळाला आहे. आता भारतीय खेळाडूंना जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवता येणार आहे. जगभरात ५४ देश हा खेळ खेळत आहेत.

भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशु मित्तल यांनी आयोजनाबाबत बोलताना म्हटले की, ' आम्ही पहिल्या खो-खो वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी उत्सुक आहोत. ही केवळ एक स्पर्धा नसणार आहे, तर देशांना एकत्र आणण्याचं आणि संपूर्ण जगाला खो-खो या खेळाचं सौंदर्य दाखवण्याचं काम करणार आहे. खो- खो खेळाला ऑलिम्पिक मान्यता मिळवून देणे हे आमचे अंतिम ध्येय असणार आहे. हे वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.




## मेहदी हसनने स्वत:च्या कंपनीची बॅट विराट अन् रोहितला दिली

भारत आणि बांग्लादेश यांच्यात नुकतीच कसोटी मालिका झाली. या कसोटी मालिकेत भारतीय संघाने २-० अशा फरकाने विजय मिळवला. कानपूर कसोटीत बांगलादेशचा स्टार अष्टपैलू खेळाडू मेहदी हसन मिराजने रोहित शर्माला दोन्ही डावात बाद केले होते. आता कसोटी मालिका संपल्यानंतर मेहदी हसनने रोहित शर्मा आणि विराट कोहलीला खास बॅट भेट दिली आहे. यादरम्यानचा एक मेजशीर व्हिडीओ समोर आला आहे.

मेहदी हसन मिराजने रोहित शर्मा आणि विराट कोहलीला एक-एक बॅट भेट दिली. रोहित शर्माला बॅट देताना मेहदी म्हणाला, मी रोहित भाईसोबत आहे आणि मी त्यांना माझ्या कंपनीची बॅट भेट दिली आहे. हे माझे स्वप्न होते आणि आता मी खूप आनंदी आहे. रोहितने मेहदीला त्याच्या नव्या सुरुवातीबद्दल शुभेच्छाही दिल्या आणि म्हणाला, मी मेहदीला बऱ्याच काळापासून ओळखतो. तो एक महान क्रिकेटर आहे आणि मला अभिमान आहे की त्याने स्वत:चा बॅटचा व्यवसाय सुरू केला आहे. मी त्याला शुभेच्छा देतो, त्याची कंपनी खूप यशस्वी होईल, असंही रोहित शर्माने सांगितले.

## अंगात १०२ डिग्री ताप असतानाही शार्दूल ठाकूरची शानदार फलंदाजी




लखनऊच्या इकाना स्टेडियमवर मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडिया या दोन्ही संघांमध्ये इराणी कपचा सामना सुरु आहे. या सामन्यात मुंबईकर सरफराज खानची हवा पाहायला मिळाली आहे. सरफराजने पहिल्या डावात फलंदाजी करताना दुहेरी शतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबईने ५०० धावांचा पल्ला गाठला. दरम्यान हा सामना सुरु असताना स्टार खेळाडूला रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे. काय आहे प्रकरण? जाणून घ्या.

इराणी कपला १ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. स्पर्धेतील पहिल्या दिवसापासूनच शार्दुल ठाकुरची प्रकृती स्थिर नव्हती. त्याला ताप आला होता. सामन्यातील दुसऱ्या दिवशी त्याने सरफराज खानसोबत मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. त्याने व्या विकेटसाठी ७३ धावा जोडल्या. यादरम्यान त्याचा ताप आणखी वाढला. त्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आलं.

एका सुत्राने इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीत म्हटले की, 'पूर्ण दिवस तो ठिक नव्हता. त्याला ताप होता. हेच कारण होतं की, तो उशिराने फलंदाजी करायला आला. त्या कमजोरी आली होती. त्यामुळे त्याने औषध घेतलं आणि तो ड्रेसिंग रुममध्ये जाऊन झोपला. काही वेळ विश्रांती केल्यानंतर त्याला पुन्हा फलंदाजीला यायचं होतं. आम्ही त्याची डेंग्यु आणि मलेरियाची चाचणी केली आहे. आम्ही रिपोर्ट येण्याची वाट पाहतोय.

इराणी कप सुरु असतानाच स्टार खेळाडू रुग्णालयात भरती! नेमकं काय घडलं?

अशक्य ते शक्य केलं... दोन दिवसांतच बांगलादेशला नमवलं, रोहितसेनेचा 7 विकेट्सने विजय ताप असूनही मैदानात उतरला शार्दुल ठाकुरला ताप होता. मात्र तरीही तो मैदानात उतरला. गेल्या हंगामातही त्याला रणजी ट्रॉफी सुरु असताना तो दुखापतग्रस्त झाला होता. असं असतानाही तो मैदानात उतरला होता. मात्र यावर्षाच्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिका दौऱ्याच्या सुरुवातीला तो दुखापतग्रस्त झाला.

## सर्फराझ खानने इराणी कपमध्ये झळकावले द्विशतक



मुंबई क्रिकेट संघाचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने द्विशतक झळकावले आहे. सध्या सुरू असलेल्या इराणी कप २०२४ मध्ये मुंबई क्रिकेट संघाकडून खेळताना सर्फराझ खानने द्विशतक केले. मुंबई वि रेस्ट ऑफ इंडिया सामन्यात सर्फराझने २५५ चेंडूत २३ चौकार आणि ३ षटकारांसह २०० धावा केल्या. बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझ खानला भारतीय संघात संधी मिळाली होती. मात्र त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नाही.

सर्फराझ खान डावाच्या सुरुवातीपासूनच चांगल्या लयीत होता आणि कोणतीही जोखीम न घेता त्याने अवघ्या १५० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याने कर्णधार अजिंक्य रहाणेबरोबर उत्कृष्ट भागीदारी रचली, ज्यामुळे मुंबई संघाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात तो यशस्वी ठरला.

त्याने अवघ्या २५३ चेंडूत २०० धावा पूर्ण केल्या आणि यादरम्यान त्याने २३ चौकार आणि तीन षटकार लगावले. त्याच्यामुळेच मुंबईचा संघ मोठी धावसंख्या गाठण्यात यशस्वी ठरला आहे.

१ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या इराणी चषकाच्या सामन्यात मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडिया संघ आमनेसामने आहेत. या सामन्यात मुंबईने झटपट ४ विकेट लवकर गमावल्या. या सामन्यात मुंबईची सुरुवात खूपच खराब झाली. सलामीवीर पृथ्वी शॉ ७ चेंडूत ४ धावा करून बाद झाला. यानंतर संघाने ३७ धावांत ३ विकेट गमावल्या. मात्र, त्यानंतर रहाणे आणि सर्फराझने जबाबदारी स्वीकारली आणि मुंबईसाठी मोठी भागीदारी केली. रहाणेचे शतक ३ धावांनी हुकले. त्याने २३४ चेंडूत ९७ धावा केल्या होत्या.



## इंग्लंडच्या हॅरी ब्रुकने मोडला विराट कोहलीचा मोठा रेकॉर्ड!

टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू आणि कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन अडचणीत सापडले आहेत. ईडीने मनी लाँड्रिंग प्रकरणात अझरूद्दीन यांना समन्स पाठवले आहेत. अझरुद्दीनवर हैदराबाद क्रिकेट असोसिएशनमध्ये २० कोटी रुपयांच्या निधीचा गैरवापर केल्याचे म्हटले जात आहे. अझरुद्दीनला आज ईडीसमोर हजर व्हावे लागणार आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू आणि कॉंग्रेस पक्षाचे नेते असलेले अझरूद्दीन यांनी पहिल्यांदाच समन्स बजावण्यात आले आहेत. अझरुद्दीन हे हैदराबाद क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षही राहिले आहेत. त्यांच्या कार्यकाळात निधीचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर आहे. त्यांना आज तपास यंत्रणेसमोर हजर राहावे लागणार आहे. हे प्रकरण हैदराबादच्या उप्पल येथील राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमसाठी डिझेल जनरेटर, अग्निशमन यंत्रणा आणि छत खरेदीसाठी वाटप करण्यात आलेल्या २० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराशी संबंधित आहे.अझरुद्दीन यांची सप्टेंबर २०१९ मध्ये हैदराबाद क्रिकेट असोसिएशन चे अध्यक्ष म्हणून निवड झाली. जून २०२१ मध्ये त्यांना आपले पद सोडावे लागले होते. निधीचा गैरवापर केल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. ईडीने हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या अधिकाऱ्यांविरुद्ध मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता. ईडीच्या म्हणण्यानुसार, हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या अधिकाऱ्यांनी राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमच्या बांधकामात आर्थिक गैरवापर केला होता.

## आठवड्यातून तीनदा प्या पपईच्या पानांचे एक कप पाणी



अनेक लोक घरी आवडीने पपईचे झाड लावतात आणि पपईचा आस्वाद घेतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांना पपई खूप आवडते. पपई खाण्याचे अनेक फायदे आहेत. पण, तुम्हाला माहितेय का, फक्त पपईच नाही, तर या झाडाची पानेसुद्धा तितकीच पोषक असतात; जी आरोग्याच्या विविध समस्या दूर करण्यास मदत करतात. पपईच्या पानांचे पाणी आरोग्यास कसे फायदेशीर आहे, हे आज आपण जाणून घेणार आहोत.

**पपईच्या पानांचे पाणी किती प्यावे?**

TOI ने दिलेल्या वृत्तानुसार, आठवड्यातून तीनदा फक्त एक कप पपईच्या पानांचे पाणी प्यावे, असा सल्ला दिला जातो. पण, या पाण्याचे सेवन प्रत्येकाच्या वैयक्तिक आरोग्यावर अवलंबून आहे. पपईच्या पानांचे पाणी घेण्यापूर्वी नेहमी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि तुम्ही योग्य प्रमाणात ते घेत आहात का, याची खात्रीसुद्धा करावी.

पपईच्या पानांचे पाणी आरोग्यासाठी कसे फायदेशीर ते जाणून घेऊ या.

**प्लेटलेट्सची संख्या वाढवते**

पपईच्या पानांचे पाणी डेंग्यूच्या आजारांचा सामना करण्यास फायदेशीर आहे. या पाण्याच्या सेवनाने डेंग्यूमध्ये रुग्णाच्या प्लेटलेट्सची संख्या वाढण्यास मदत मिळते. जेव्हा एखाद्याला डेंग्यूचा आजार होतो तेव्हा प्लेटलेट्सच्या संख्येत झपाट्याने घट होते. पण, पपईच्या पानांचे पाणी नियमित सेवन केल्यास डेंग्यूचा रुग्ण लवकर बरा होऊ शकतो.

**भरपूर अँटिऑक्सिडंट्स असतात**

पपईच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई व फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून दूर ठेवतात. पपईच्या पानांचे पाणी नियमित प्यायल्याने पेशी खराब होत नाहीत. या पानांच्या पाण्यातील अँटिऑक्सिडंट्स हृदयविकार, मधुमेह आणि विशिष्ट प्रकारचे कर्करोग यांसारख्या आजारांचा धोका कमी करू शकतात.

**पचनसंस्था निरोगी राहते**

पपईच्या पानांचे पाणी प्यायल्याने बद्धकोष्ठतेसारख्या पचनक्रियेशी संबंधित समस्या दूर होतात. त्याशिवाय जळजळ कमी होते आणि आतड्यातील निरोगी जीवाणू वाढतात

**सांधेदुखी व स्नायूदुखी दूर होते**

पपईच्या पानांच्या पाण्यात अल्कालॉइड्स आणि फ्लेव्होनॉइड्स यांसारखी संयुगे असतात, जी शरीरातील सूज कमी करण्यास मदत करतात. तसेच त्यामुळे सांधेदुखी, स्नायूदुखी यांसारख्या त्रासांपासून आराम मिळू शकतो.

## अभिषेकशी लग्न होण्याआधी ऐश्वर्या रायचा अपघात पाहून अमिताभ बच्चन यांची झालेली 'अशी' अवस्था



ऐश्वर्या राय ही महानायक अमिताभ बच्चन यांची सून आहे. पण ऐश्वर्याने अभिषेक बच्चनशी लग्न करण्याआधी अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम केलं होतं. 'मोहब्बतें' आणि 'खाकी' या चित्रपटांमध्ये त्यांनी स्क्रीन शेअर केली होती. तेव्हाचाच एक प्रसंग आहे. ऐश्वर्याचा अपघात डोळ्यांनी पाहिल्यावर अमिताभ बच्चन दोन रात्री झोपू शकले नव्हते.

'खाकी' सिनेमाच्या सेटवर ऐश्वर्या अपघातात जखमी झाली होती. तिचा डोळ्यांसमोर अपघात झालेला पाहून बिग बी खूप चिंतेत होते आणि दोन रात्री झोपू शकले नव्हते. एक स्टंट मॅन वेगाने गाडी चालवत होता, त्याचे नियंत्रण सुटले आणि कार ऐश्वर्याच्या खुर्चीवर आदळली होती. यामुळे ऐश्वर्याला गंभीर दुखापत झाली होती, त्यानंतर तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

## एक्स बॉयफ्रेंडचे फोटो जाळले, बॉलीवूड अभिनेत्रीने ब्रेकअपनंतर 'असा' काढला राग

अनन्या पांडे सध्या सध्या विक्रमादित्य मोटवानी दिग्दर्शित CTRL या सिनेमाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने तिने ती ब्रेकअप झाल्यावर काय करते असं सांगितलं. यावेळी तिने खुलासा केला की तिने तिच्या एका एक्स बॉयफ्रेंडचे फोटोही जाळले होते. आता ब्रेकअपसारख्या गोष्टी जास्त समजुतदारपणे हाताळत असल्याचंही तिने नमूद केलं. गॅलाटा इंडियाशी बोलताना अनन्याने ब्रेकअप झाल्यावर ती त्यातून कशी सावरते, ते सांगितलं. अनन्या म्हणाली, "परिस्थितीला सामोरे जा. ब्रेकअप स्वीकारा, कारण या जगात काहीच पर्मनंट नाही. तुम्ही यातून काहीतरी मार्ग नक्कीच काढाल." चित्रपट निर्माते विक्रमादित्य मोटवानी यांना हाच प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांनी प्रेमभंग झाल्यावर त्याचा सामना करणं महत्त्वाचं आहे, असं सांगितलं. "तुम्हाला याचा सामना करावा लागेल, एकतर एखाद्याशी बोलून किंवा त्यांची फोटो जाळून", असं ते म्हणाले.अनन्याने प्रेमभंग (हार्टब्रेक) झाल्यानंतर तिच्या एक्स बॉयफ्रेंडचे फोटो कधी जाळले का? असं विचारल्यावर ती म्हणाली, "मी आता तसं करत नाही, पण मी तसं केलं आहे. खरं तर असं करणारी मी पृथ्वीवरील एकमेव नाही, बरेच लोक असं करतात.



## दिनविशेष

**घटना**

२०२१: बब्बा वॉलेस - NASCAR प्रमुख शर्यत जिंकणारे पहिले आफ्रिकन-अमेरिकन ड्रायव्हर बनले. \
२००६: विकिलिक्स ज्युलियन असांज यांनी सुरु केले.
१९९२: रोम सामान्य शांतता करार मोझांबिक देशातील १६ वर्षे चालू असणारे गृहयुद्ध संपले.
१९९१ : अंटार्क्टिक करार पर्यावरण संरक्षणाचा प्रोटोकॉल स्वाक्षरीसाठी खुला झाला.
१९८५ : फ्री सॉफ्टवेअर फाउंडेशन स्थापना झाली.
१९८३: रिचर्ड नोबल - यांनी ब्लॅक रॉक वाळवंट, नेवाडा येथे ६३३.४६८ मैल प्रतितास (१,०१९.४६८ किमी/तास) असा नवीन लँड स्पीड रेकॉर्ड केला.
१९६३ : फ्लोरा क्यूबा चक्रीवादळ फ्लोरा क्यूबा आणि हैतीमध्ये किमान ६ हजार लोकांचे निधन.
१९५७: स्पुतनिक १ - पृथ्वीभोवती फिरणारा पहिला कृत्रिम उपग्रह बनला. ह्या घटनेपासून अंतराळयुगाचा प्रारंभ झाला.
१९४३ : दुसरे महायुद्ध - अमेरिकेने सॉलोमन बेटे ताब्यात घेतली.
१९२७: माऊंट रशमोअर - गस्टन बोरग्लम यांनी हे शिल्प कोरण्यास सुरुवात केली.
१९१७ : पहिले महायुद्ध - ब्रूडसेइंडची लढाई: ब्रिटीश आणि जर्मन सैन्यांमध्ये फ्लैंडर्समध्ये लढली गेली.
१८८३ : ओरिएंट एक्सप्रेस सुरु झाली.

**जन्म**

१९९७: रिषभ पंत - भारतीय क्रिकेटपटू
१९६१: काझुकी ताकाहाशी - जपानी लेखक आणि चित्रकार, युगी ओहचे निर्माते (निधन: ४ जुलै २०२२)
१९४५ : सेदापट्टी मुथिया - भारतीय राजकारणी, खासदार (निधन: २१ सप्टेंबर २०२२)
१९४२: जोहान्ना सिगुरर्डोत्तिर- आइसलँडचे राजकारणी, आइसलँड देशाचे २४वे पंतप्रधान
१९३८: कर्ट वुश्रिच - स्विस रसायनशास्त्रज्ञ आणि जैवभौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पुरस्कार
१९३७ : जॅकी कॉलिन्स इंग्लिश लेखिका व अभिनेत्री

**मृत्यू**

२०२२ : शेखर जोशी - भारतीय लेखक (जन्म: १० सप्टेंबर १९३२)
२०१५ : एडिडा नागेश्वर राव भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते (जन्म: २४ एप्रिल १९३४)
२०१४: जीनक्लॉड डुवालियर - हैती देशाचे ४१वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३ जुलै १९५१)
२०१३ : जॉन क्लाउडस्लेथॉम्पसन पाकिस्तानी-इंग्रजी कमांडर (जन्म: २३ मे १९२१)
२०१३ : निकोलस ओरेस्को अमेरिकन सार्जंट मेडल ऑफ ऑनर विजेते (जन्म: १८ जानेवारी १९१७)
२००२ : भाई भगत - वृत्तपट निवेदक
२०००: मायकेल स्मिथ इंग्रजी कॅनेडियन बायोकेमिस्ट आणि अनुवंशशास्त्रज्ञ नोबेल पुरस्कार (जन्म: २६ एप्रिल १९३२)
१९९८: एस. आरासरत्नम - श्रीलंकेचे इतिहासकार आणि शैक्षणिक (जन्म: २० मार्च १९३०)
१९९८ : जीन-पास्कल डेलामुराझ स्विस कॉन्फेडरेशनचे ८०वे अध्यक्ष आणि राजकारणी (जन्म: १ एप्रिल १९३६)

## राशि भविष्य

**मेष** - तुमच्या भावना खासकरून रागावर नियंत्रण ठेवा. ज्या लोकांनी कुणी अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्यावर काही धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**वृषभ** - आज तुम्हाला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील - त्यामुळे तुम्ही तणावपूर्ण व्हाल आणि कमालीचे उदास व्हाल. आज तुमच्यासमोर सादर झालेल्या गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा.

**मिथुन** - आज तुमचे स्वास्थ्य उत्तम राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकतात.

**कर्क** - आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे. 'सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी मनातूनच जन्माला येतात त्यामुळे मन हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

**सिंह** - सकारात्मकपणे विचार करण्याची सवय लावा. अन्यथा भीतीच्या काळजीच्या भयंकर अशा राक्षसाशी सुरू असणाऱ्या आपल्या लढ्यामध्ये आपण त्या दुष्ट प्रवृत्तीचे निष्क्रिय आणि निदर्यी बळी होऊ शकता.

**कन्या** - ज्येष्ठांनी त्यांच्या तब्येतीला जपून राहण्याची गरज आहे. आजच्या दिवशी धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून देवाण-घेनानीने जोडलेल्या गोष्टींमध्ये जितके तुम्ही सतर्क राहाल तितकेच तुमच्यासाठी चांगले असेल

**तूळ** - लहान मुलांबरोबर खेळण्यातून मौज मस्ती करणे हा आपल्या दुखावर चांगला उपाय असेल. आज तुम्हाला व्यर्थ खर्च करण्यापासून स्वतःला थांबवले पाहिजे अथवा गरजेच्या वेळी तुमच्या जवळ पैश्याची कमतरता होऊ शकते.

**वृश्चिक** - आजचा दिवस लाभदायक असून, तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे.

**धनु** - तुमची प्रकृती सुधारा आणि चांगले आयुष्य जगण्यासाठी संपूर्ण व्यक्तिमत्व बदलण्याचा प्रयत्न करा. तुमचे काही जुने आजार आज तुम्हाला चिंतीत करू शकतात.

**मकर** - सर्वसाधारणपणे आरोग्य चांगले असेल, पण प्रवास कटकटीचा आणि तणावपूर्ण ठरेल. पैश्याची कमतरता आज घरात कलहाचे कारण बनू शकते अश्या स्थितीमध्ये आपल्या घरातील लोकांसोबत विचारपूर्वक बोला आणि त्यांचा सल्ला घ्या.

**कुंभ** - आजचा दिवस लाभदायक असून, तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. तुमचा निर्धार आणि मेहनत याकडे सर्वांचे लक्ष जाईल आणि काही आर्थिक पारितोषिकही आज तुम्हाला मिळेल.

**मीन** - अनावश्यक तणाव आणि चिंता यामुळे तुमचा दिवसभराचा आनंद मावळेल. यावर मात करा अन्यथा समस्या अधिक गंभीर बनेल.

# पुण्यात नवरात्रोत्सवानिमित्त प्रमुख मंदिरांच्या परिसरात वाहतूक बदल

**पुणे ( अभिजित येरल्लू ) :** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शहरातील विविध मंदिरांच्या परिसरात भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन वाहतूक बदल करण्यात आले आहेत. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर, श्री चतु:शृंगी मंदिर, भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर, तसेच सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहे. या भागातील रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले आहेत. नवरात्रोत्सवात बुधवार पेठेतील श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराच्या परिसरात भाविकांची गर्दी होते. गुरुवारपासून (३ ऑक्टोबर) अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौकापर्यंतचा (हुतात्मा चौक) रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक दरम्यान एकेरी वाहतूक सुरु राहणार राहणार असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी कळविले आहे. लक्ष्मी रस्त्यावरील गणपती चौक ते श्री तांबडी जोगेश्वरी दरम्यानचा रस्ता वाहतुकीस बंद राहणार आहे. सकाळ कार्यालयापासून श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराकडे



जाणारा रस्ता अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून अन्य वाहनांनासाठी बंद राहणार आहे. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे, तसेच शनिवार पेठेतील श्री अष्टभूजा मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी वाहने नदीपात्रातील रस्ता, मंडईतील वाहनतळावर लावावीत. सेनापती बापट रस्त्यावरील श्री चतु:शृंगी मंदिर परिसरात गर्दी झाल्यास या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. या भागात गर्दी वाढल्यास सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक वेताळबाबा चौकमार्गे दीप बंगला चौक, ओम सुपर मार्केटमार्गे वळविण्यात येणार आहे. भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहे. नेहरु रस्त्याने श्री भवानी माता मंदिराकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. नेहरु रस्ता ते श्री भवानी माता मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. गर्दी वाढल्यास नेहरु रस्त्यावरील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहेत. श्रीसुक्त पठणानिमित्त शुक्रवारी (४ ऑक्टोबर) सकाळी पाच ते सात दरम्यान सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात येणार असून स्वारगेटकडून सारसबागमार्गे स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याकडे जाणारा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. मित्रमंडळ चौकाकडून पूरम चौकाकडे येणारा मार्ग वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे.

## ग्रॅन्ट रोड येथे इमारतीचे छत कोसळले, मातीच्या ढिगाऱ्याखाली काहीजण अडकल्याची शक्यता



**मुंबई (यश सावंत) :** ग्रॅन्ट रोड येथील मौलाना शौकत अली रोडवरील शालिमार हॉटेलनजिक गुरुवारी सकाळी १०.३० च्या सुमारास युनायटेड चेंबर्स या इमारतीच्या दुसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील छत कोसळले. या दुर्घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र ढिगाऱ्याखाली काहीजण अडकल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ग्रॅन्ट रोड येथील युनायटेड चेंबर्सच्या दुसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील छत कोसळताच रहिवाशांनी तात्काळ इमारतीबाहेर पळ काढला. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, बेस्ट उपक्रम तसेच संबंधित पालिकेच्या विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि मदतकार्य हाती घेण्यात आले. छताच्या कोसळलेल्या ढिगाऱ्याखाली काहीजण अडकल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## नवीन पनवेल येथील शिक्षण संस्थाचालकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**पनवेल ( धनश्री सट्टा ) :** नवीन पनवेल येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षांसह इतर कार्यकारीणीतील विश्वस्तांविरोधात बुधवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून रितसर चौकशी सुरु केली आहे. विशेष म्हणजे सरकारी यंत्रणांना ही शैक्षणिक संस्था विनापरवानगी किंवा बनावट दस्ताऐवजांवर सुरु असल्याचे समजण्यासाठी १८ वर्षे लागली याचीच चर्चा परिसरात आहे. १८ वर्षांनंतर हे



विनापरवानगीचे प्रकरण बाहेर आल्याने मागील १८ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांनी या संस्थेतून शिक्षण मिळवले असून त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली जात आहे.

२००६ ते २०२४ या दरम्यान आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाने ही फसवणूक केल्याचे पोलिसांच्या तक्रारीत म्हटले आहे. सिडको मंडळाने नवीन पनवेल येथील सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक ४१ येथील जागा नोकरदार महिलांच्या वसतिगृहासाठी या संस्थेला दिली होती.

## अर्बन अल्ट्रा रनचे रविवारी उद्घाटन "एक दौड वीर जवानों के लिए"चे ५ वे वर्ष

**कल्याण (गणेश बागडे ) :** धावपटूंच्या क्षेत्रातील एक आगळीवेगळी धाव "एक दौड वीर जवानों के लिए" ६५ किलोमीटर अर्बन अल्ट्रा रन (पर्व ५ वे) ही धाव गेटवे ऑफ इंडिया ते डोंबिवली दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी रनर्स क्लन फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फत आयोजित केली आहे. या सामाजिक उपक्रमाचा उद्घाटन सोहळा रविवारी ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता सावळाराम क्रीडा संकुल, डोंबिवली येथे होणार आहे. या आगळयावेगळया रन मध्ये महाराष्ट्रातून तसेच देशभरातून ५०० ते ६०० धावपटू धावणार आहेत. हि धाव प्रामुख्याने तीन प्रकारची असेल त्यामध्ये ६५ कि.मी. ३५ की.मी. आणि १५ की. मी. पूर्ण करण्याची आहे. या तीनही प्रकाराचा शेवट डोंबिवली येथे होणार असून या धावेत क्रांती साळवी या रनच्या ब्रँड अँबेसिडर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मॅरेथॉन आहेत. त्यांनी यापूर्वी अनेक मॅरेथॉन साडी परिधान करून पूर्ण केले आहेत त्याचप्रमाणे त्या ६५ किलोमीटर मॅरेथॉन देखील साडी परिधान करून पूर्ण करणार आहेत. हा उद्घाटन सोहळा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, क्रांती साळवी, बिजय नायर निवृत्त लेफ्टनंट कमांडर भारतीय नौसेना, के. हरिदासन कोच रणटॅस्टिक दिलसे, माधव सिंग ग्लोब बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, रूप बेताला इंटरनॅशनल मॅरेथॉनर, निखिल दुधे, पॅसिफिक बिल्डर ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

## नंदुरबार जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

**नंदुरबार (नितीन देवळेकर) :** जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील राणीपूर गावाजवळ बुधवारी दुपारी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात बकऱ्या चारणाऱ्या १० वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. वनविभागाला घटनेविषयी माहिती मिळूनही ते घटनास्थळी उशिरा दाखल झाल्याने ग्रामस्थांनी रोष व्यक्त केला.

राणीपूर गावालगत अंबापूर-राणीपूर रस्त्यावर रोहित मोरे (१०) हा दोन मित्रांसह बकऱ्या चारत असताना अचानक बिबट्याने हल्ला केला. बिबट्याने रोहित यास उसाच्या शेतात फरफटत नेले. दोन्ही मित्रांनी आरडाओरडा करत ग्रामस्थांना माहिती दिली. रोहितचे नातेवाईक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. काही ग्रामस्थांनी घडलेल्या प्रकारासंदर्भात वन विभागाला माहिती दिली.

रोहित हा मावशीबरोबर शेतातील झोपडीत राहत होता. पंधरा दिवसांपूर्वी राणीपूर ग्रामस्थांनी वन विभागाला परिसरात बिबट्याचा वावर असल्याने पिंजरा लावण्याविषयी विनंती केली होती. वन विभागाने पिंजरे लावले असते तर रोहितचा बळी गेला नसता, अशी संतप्त भावना राणीपूर ग्रामस्थांनी व्यक्त



केली. बुधवारी राणीपूर ग्रामपंचायतीत महात्मा गांधी जयंती लालबहादूर जयंती असल्याने ग्रामसभा होती. या ग्रामसभेत वन विभागाला उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते. परंतु, वनविभागाचे अधिकारी गैरजर राहिले. बिबट्याच्या हल्ल्यात एका मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच घटनास्थळी राणीपूर, तलावडी, इस्लामपूर, लक्कडकोट येथील ग्रामस्थांनी गर्दी केली होती. काही ग्रामस्थांनी म्हसावद पोलीस ठाण्याला घडलेल्या घटनेसंदर्भात कळविल्यानंतर म्हसावद ठाण्याचे सहायक निरीक्षक गणेश वारुळे, उपनिरीक्षक जितेंद्र पाटील हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले होते.

## Bombay High Court orders quick magisterial inquiry into custodial death in Badlapur sex abuse case

**Mumbai :** The Bombay High Court on Thursday ordered an expedited magisterial inquiry into the custodial death of a janitor accused in the Badlapur sexual assault case, whose father has alleged he was killed in a fake encounter by police. The court said the father would be heard during the inquiry.

A bench of Justices Revati Mohite-Dere and Prithviraj K Chavan, while hearing the father's plea seeking an inquiry by a Special Investigation Team, sought a report of the magisterial inquiry by November 18.

Advocate-General Birendra Saraf informed the court that the postmortem report and the inquest panchnama had been forwarded to the magistrate along with other relevant documents.

The court emphasised the need to properly examine the police officer who sustained a gunshot injury and to investigate his injury certificate. "The bullet injury must also be having some residue so as to correlate which gun's bullet hit him," it remarked.

The bench observed that the glass or bottle from which the accused allegedly drank water



was an important piece of evidence and inquired whether fingerprints from it had been taken and examined.

On September 23, the 23-year-old janitor, arrested in August for allegedly sexually assaulting two four-year-old girls at a school in Badlapur, Thane, was shot dead while being transported in a police vehicle. The police claimed he was killed in "retaliatory firing" after he snatched an officer's service weapon and fired three rounds, injuring an officer.

According to the police, the man was initially handcuffed, but one hand was freed when he requested a glass of water. The Maharashtra CID is investigating the janitor's killing.

During the last hearing, on September 25, the court questioned the police's claim that the accused was killed in retaliatory firing, stating that "this cannot be termed as an encounter".

On Thursday, Advocate-General Saraf submitted that all directions issued by the court during the last hearing had been complied with by the police. Responding to the court's queries, he said there was no ricochet pattern in the injury sustained by the policeman and that a total of four shells were recovered during the investigation. The court noted that as the bullets were fired from two different firearms, the "firing pin" of the gun could serve as conclusive proof in the case.

## Govt delay in publishing full list of candidates eligible for Sarathi scholarship keep students pursuing higher studies abroad hanging

**Pune :** Sakshi (name changed), a student from Maharashtra, currently studying in Europe constantly finds herself buying cheaper unhealthy foods as wholesome and nutritious fruits and vegetables are on the higher end of pricing. She also spends 40 minutes walking to the campus from her accommodation instead of using public transport in order to save all the money she can.

"Throughout the day, I constantly find myself worrying whether I will be selected for the scholarship or not. I constantly find ways to cut down my expenditure, like walking everywhere, and these things take away from my study hours. So



it feels like I am not doing justice to the purpose I came here for. One needs a stress-free environment to excel at studies," she said.

Sakshi had applied for the Sayajirao Gaekwad Sarathi scholarship this year, which is yet to declare a list of selected candidates, even as the courses have already started. The Maharashtra government had approved the Sayajirao Gaekwad Sarathi scholarship for meritorious students coming from Maratha community to pursue higher studies abroad.

The scholarship, approved in July 2023, is for students from Maratha and Kunbi categories from Maharashtra, through Sarthi—a non-profit government company for Marathas. The scholarship is given to pursue masters degree, postgraduate diploma (PG diploma), as well as PhD. In the first year, 75 students were expected to benefit from the scholarship. However, a government resolution (GR) declared names of 21 selected candidates, for all courses combined.

"Last year, Sarathi received only 83 applications. This year, the number of applications is around 150 and the seats are 75. The application has still not been verified by the Sarathi organisation. Directors have not yet had time to look into this plan. Once this process is completed, the applications go to the selection committee in the Ministry and then the list is prepared, which usually takes a month.

## "Forest officials don't hate animals": SC on Raj order to kill man-eater leopard

**Navi Delhi :** The Supreme Court on Thursday said forest officials don't hate animals while hearing a petition challenging the order by the Rajasthan government to shoot man-eating leopard on sight.

The development comes at a time when the Rajasthan government has hired an expert shooter to kill the man-eating leopard.

A bench headed by justice Bhushan R Gavai said, "The order also provides that an attempt should be first made to tranquilise and trap. Don't think forest officials hate these animals. They love them and are not anti-animals."

The court was hearing a petition filed by wildlife activist Ajay Dubey who challenged the shoot-at-sight order issued by the state authorities on October 1.

The bench, also comprising justices PK Mishra and KV Viswa-



nathan permitted the petitioner to approach the Rajasthan high court.

Advocate Siddharth R Gupta appearing for Dubey said that he apprehended danger to the leopard's life as there are several leopards which have been trapped without identifying the killer leopard.

He said that following the shoot-at-sight order issued by the Chief Wildlife Warden (CWW), sharp shooters have been called in from Hyderabad who are surveying the area with an intention to kill.

He said that the order issued by the authorities violates the standard operating procedure (SOP) issued by the National Tiger Conservation Authority (NTCA) to deal with such situations. It said that killing should be the last resort, Gupta added. He further submitted that this SOP was considered by the Bombay high court when a similar instance arose where the authorities were tracking down a man-eater tiger. "If Bombay high court can do it, why not the Rajasthan high court. Why don't you go to the high court. You can get relief there," the bench said, granting liberty for the petitioner to approach the high court.

The order of October 1 was issued following reported incidents of leopards attacking humans between September 18 and 30.

The attacks were reported from areas of Gram Panchayat Chhali, Bagdunda, Majavad, and Madar. The six cases resulted in death of humans.

## गारगाई धरण प्रकल्प रखडणार

● मुंबई , (विशाल कारंडे ) :



मुंबई महापालिकेने पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन गारगाई धरण प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी अन्य सर्व परवानग्या मिळाल्या आहेत. मात्र गेल्या चार वर्षांपासून वन विभाग आणि वन्यजीव विभागाची परवानगी मिळू न शकल्याने हा प्रकल्प रखडला आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जारी झाल्यास परवानगीची प्रक्रिया आणखी रखडण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे भविष्यात पाण्याची मागणी आणि पुरवठा यातील तूट भरून काढणे कठीण होणार आहे.

गारगाई धरणासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे कापावी लागणार असल्यामुळे हा प्रकल्प पालिका प्रशासनाने बाजूला ठेवला होता. मात्र मध्य वैतरणा धरण २०१४ मध्ये बांधून पूर्ण झाल्यानंतर गेल्या १० वर्षांत एकही नवीन धरण मुंबई पालिकेने बांधलेले नाही. त्यातच समुद्राचे पाणी गोडे करण्याचा प्रकल्पही रखडला आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने गारगाई धरण प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामुळे तानसा अभयारण्य बाधित होणार असून त्याकरिता वन्यजीव विभागाची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच वन विभागाचीही परवानगी आवश्यक आहे. या परवानग्यांसाठी २०२० मध्ये अर्ज करण्यात आला असून त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लोणावळा दौऱ्यावर

● पिंपरी-चिंचवड, शकिल शेख :

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी (४ ऑक्टोबर) दुपारी मावळ दौऱ्यावर येणार असून कार्ला गड येथील एकवीरा आईचे दर्शन घेणार आहेत. गडावरील पायऱ्यांची दुरूस्ती, संरक्षण भिंत, मुख्य मंदिराची दुरूस्ती, विश्रांती कक्ष अशा ३९.४३ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला वेहेरगाव येथील कुलस्वामिनी आई एकविरा देवीच्या मंदिरात गुरुवारी घटस्थापना झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त कार्ला गडावर एकवीरा देवीच्या दर्शनासाठी येत असतात. गडावर येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा निर्माण करण्याबाबत खासदार बारणे यांनी पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्ला गडाचा कायापालट करण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणातून (एमएमआरडीए) ३९.४३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदाराला वर्क ऑर्डरही देण्यात आली आहे. या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

मंदिर, नगारखाना, स्तंभ व समाधीच्या जीर्णोद्धारासह मंदिर परिसरातील कामे केली जाणार आहेत. मुख्य मंदिर, नगारखान्याची दुरुस्ती, स्तंभ व समाधीच्या दगडी बांधकामाची सफाई आणि सांधे भरणी, सद्यस्थितीतील रांग मंडप उतरवून नवीन रांग मंडप उभारणे, मोकळ्याजागेत बगीचा निर्माण करणे, तिकीटघर व शौचालय बांधणे, डोंगराच्या कठड्याला लागून दगडी पादचारी रस्ता तयार करणे, पायऱ्यांची दुरूस्ती, संरक्षण भिंत, शौचालय, पार्किंगचे बांधकाम, धबधब्या जवळ तटबंधी दुरुस्ती करून विश्रांती क्षेत्र तयार करणे, पायऱ्यांच्या मध्यंतरी दमलेल्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, बाकडे आणि कचरापेट्या बसवणे, भाविक व पर्यटकांच्या माहिती व सुरक्षिततेसाठी सूचना फलके बसविण्याच्या कामाचा शुभारंभ होणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

## थोडक्यात



### आंबा बर्फीनंतर चोरट्यांच्या सुकामेव्यावर ताव

**पुणे** - वारजे भागातील सुकामेवा विक्री करणाऱ्या दुकानातून चोरट्यांनी सुकामेव्याची पाकिटे, तसेच रोकड असा एक लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. आठवड्यापूर्वी चोरट्यांनी येरवड्यातील गोल्फ क्लब रस्त्यावरील असलेल्या मिठाई विक्री दुकानातून अडीच किलो आंबा बर्फी, रोकड चोरून नेली होती.

याबाबत नरेशभाई आमराभाई चौधरी (वय ३७, रा. पॉप्युलरनगर, वारजे) यांनी वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चौधरी यांचे वारजे भागातील आरएमडी कॉलेजजवळ असलेल्या पॉप्युलर प्रेस्टीज सोसायटीत द ड्रायफ्रुट हाऊस हे सुकामेवा विक्रीचे दुकान आहे. चोरट्यांनी मध्यरात्री दुकानाचे कुलूप तोडले. दुकानातील गल्ला उचकटून रोकड चोरली, तसेच दुकानातील काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड, अंजीरची पाकिटे चोरट्यांनी चोरून नेली. रोकड, तसेच सुकामेवा असा एकूण मिळून चोरट्यांनी एक लाख तीन हजार ३२५ रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे यांनी घटनास्थळी भेट दिली.

### कल्याणमध्ये स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्याला पालिका आयुक्तांची नोटीस



**कल्याण** - येथील पश्चिमेतील ब प्रभागातील रस्ते, नाले, सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणारे घनकचरा विभागाचे स्वच्छता अधिकारी अविनाश मांजरेकर यांना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटिसीला ४८ तासात उत्तर देण्याची तंबी नोटिसीत देण्यात आली आहे. या कारवाईमुळे इतर प्रभागांमध्ये काम करणाऱ्या स्वच्छता अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

कचरामुक्त कल्याण, डोंबिवली शहरे करण्यासाठी पालिका प्रशासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. स्वच्छता हा पालिके बरोबर नागरिकांच्याही सहभागाचा विषय आहे. हेही नागरिकांना पटवून देण्यासाठी पालिकेकडून विविध उपक्रम राबविले जात आहे. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड उद्याने, बगिचे, सार्वजनिक ठिकाणी सकाळच्या वेळेत फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांशी थेट संवाद साधून आपल्या प्रभागात स्वच्छता होते की नाही. पालिका स्वच्छता अधिकारी, कामगार आपल्या प्रभागात वेळेवर येतात की नाही. आपल्या प्रभागातील कचरा नियमित उचलला जातो की नाही याविषयीची माहिती घेत आहेत.

## वरळी अपघातप्रकरणी लवकरच प्रत्यक्षदर्शीची साक्ष, दोन दिवसांत ७०० पानांचे आरोपपत्र

● मुंबई, (विशाल कारंडे ) :



वरळी सी फेस परिसरात कावेरी नाखवा यांच्या अपघात प्रकरणाचा तपास जवळपास पूर्ण झाला असून वरळी पोलीस या प्रकरणी एक – दोन दिवसांत ७०० हून अधिक पानांचे आरोपपत्र न्यायालयात सादर करणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे या अपघाताचा एका प्रत्यक्षदर्शी टॅक्सीचालकाचा पोलिसांनी शोध घेतला असून महानगर न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर त्याची साक्ष नोंदवण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रकरणात आतापर्यंत ३८ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. परिस्थितीजन्य पुराव्यानुसार अपघाताच्या वेळी मिहीर शहाने मद्यपान केल्याची बाब स्पष्ट झाल्यामुळे या प्रकरणी मोटर वाहन कायदा कलम १८५ ची वाढ करण्यात आली असून अपघातग्रस्त मोटरगाडीच्या नोंदणीसह आरोपी मिहीर शहा, राजऋषी बिडावत या दोघांचेही चालक परवाने रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुख्य आरोपी मिहीर शहा, राजऋषी बिडावत व मिहीर शहाचे वडील राजेश शहा यांच्याविरोधात एक-दोन दिवसांत शिवडी न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात येणार आहे. सुमारे ७१६ पानांच्या या आरोपपत्रात ३८ साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या आहेत. वरळी पोलिसांनी नुकताच एका टॅक्सीचालकाचा शोध घेतला असून अपघाताच्या वेळी तो वरळी येथील सी. जे. हाऊससमोर उभा होता. आरोपी चालकाने कशा प्रकारने महिलेला फरपटत नेले याची माहिती त्याने पोलिसांना दिली असून त्याची साक्ष न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर नोंदवण्यात येणार आहे. एवढा गंभीर अपघात माझ्या जीवनात मी पाहिला नसल्याची भावना व्यक्त करत या साक्षीदाराने घडलेल्या संपूर्ण घटनाक्रमाची माहिती पोलिसांना दिली.

## न्यायालयाच्या आदेशानंतरही नियुक्ती देण्यास अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ?

● नागपूर, नितीन देवळेकर :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेतून २०२ उमेदवारांची निवड झाली. या उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे करण्यात आली आहे. असे असतानाही मागील १० महिन्यांपासून त्यांना नियुक्ती मिळालेली नाही.

'एमपीएससी'कडून २०२१ मध्ये कृषी उपसंचालक (वर्ग १) १९, तालुका कृषी अधिकारी (वर्ग २) ६१, मंडळ कृषी अधिकारी (वर्ग २)-१२२ अशा एकूण २०२ पदांसाठी जाहिरात देण्यात आली. यानंतर मुख्य परीक्षा व मुलाखत घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवारांची शासनाकडे शिफारस केली. या सर्व उमेदवारांची कागदपत्रे १७ व १८ ऑगस्ट



२०२३ रोजी तपासण्यात आली. त्यानंतर नियुक्ती मिळणे अपेक्षित होते. परंतु, नियुक्तीची प्रक्रिया कृषी विभागाकडून अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे त्यांनी मुंबई येथील आझाद मैदानात बेमुदत आंदोलनही केले. परंतु या जाहिरातीवर उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्यामुळे त्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या होत्या. २६ सप्टेंबर रोजी कृषी विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि शिफारस पात्र उमेदवार यांच्या वकिलांनी यावरील सुनावणी पूर्ण केली.

## भाजपासाठी मतं मागणारा नेता एका तासात काँग्रेसमध्ये, राहुल गांधींच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :

कोणत्याही निवडणुकीत मतदान होत नाही तोवर कधीही राजकीय समीकरणं बदलू शकतात. कोणताही लहान-मोठा नेता कुठल्याही क्षणी पक्ष बदलू शकतो. अशीच काहीशी स्थिती हरियाणात पाहायला मिळाली आहे. हरियाणात विधानसभेची निवडणूक अवघ्या काही तासांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सर्वच पक्षांचे नेते आपापल्या पक्षांचा, उमेदवारांचा प्रचार करत आहेत. अशातच भाजपाचा एक नेता निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसमध्ये दाखल झाला आहे. हा नेता दुपारी दोनच्या सुमारास भाजपा उमेदवारांसाठी मतं मागत होता. मात्र काहीच वेळात, दुपारी तीनच्या सुमारास त्याने पक्ष बदलला. अशोक तन्वर असं या नेत्याचं नाव असून त्यांनी आता काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीचा प्रचार काही वेळात थांबणार आहे. त्याआधीच तन्वर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

## महाराष्ट्रातील 'वंदे भारत एक्सप्रेस' ट्रेन बंद होण्याची आहे दाट शक्यता

● नवी दिल्ली, (प्रगती शर्मा ) :

भारतामधील जवळपास सर्वच राज्यांमध्ये वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन चालवल्या जात आहेत. देशातील सर्वात आधुनिक ट्रेन म्हणून वंदे भारतचं नाव घेतलं जातं.

वेग आणि या ट्रेनमध्ये पुरवल्या जाणाऱ्या सुविधांमुळे आपआपल्या राज्यात वंदे भारत ट्रेन सुरु करण्यासाठी प्रत्येक राज्य रेल्वे मंत्रालयाकडे शिफारशी करताना दिसत आहेत. मध्यंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नव्या मार्गांवरील अर्धा डझनहून




अधिक वंदे भारत ट्रेन्सला हिरवा झेंडा दाखवला. या अर्धा डझन ट्रेनमध्ये दुर्ग ते विशाखापट्टणम ट्रेनचाही समावेश होता. मात्र ज्या ज्या मार्गांवर वंदे भारत ट्रेन सुरु करण्यात आल्या आहेत त्या सर्वांनाच चांगला प्रतिसाद मिळतोय असं नाही. समोर आलेल्या माहितीनुसार, अनेक मार्गांवर या ट्रेन्स अगदी रिकाम्या धावत आहेत. अगदी महाराष्ट्रासंदर्भात सांगायचं झालं तर नागपूर-सिकंदराबाद मार्गावरील वंदे भारत ट्रेनमधील ८० टक्के खुर्च्या रिकाम्याच असतात. प्रावशांची संख्या कमी असल्याने केवळ २० टक्के क्षमतेनं ही ट्रेन धावते. नागपूर-सिकंदराबाद मार्गावर केवळ २० टक्के प्रवासी या वंदे भारत ट्रेनला प्राधान्य देत असल्याने या ट्रेनचे अनेक डब्बे रिकामेच असतात. २२ ऑगस्ट रोजी सिकंदराबाद ते नागपूर मार्गावर धावलेल्या वंदे भारत ट्रेनमध्ये एकूण १४४० सीट होत्या. त्यापैकी तब्बल १२०० सीट रिकाम्याच होत्या. याच ट्रेनच्या २ एक्झिक्युटीव्ह डब्ब्यांमधील ८८ सीटपैकी केवळ १० सीट रिझर्व्ह होत्या. म्हणजेच या डब्ब्यांमधील ७८ सीट रिकाम्याच होत्या. सिकंदराबाद-नागपूर वंदे भारतला अती-अल्प प्रतिसाद मिळत असल्याने लवकरच या मार्गावरील ही ट्रेन बंद केली जाण्याची दाट शक्यता आहे. या मार्गावर १६ सप्टेंबर रोजी वंदे भारत ट्रेन सुरु करण्यात आलेली. मात्र प्राथमिक स्तरावर प्रवाशांची संख्या कमीच असेल तर आधी या ट्रेनच्या डब्यांची संख्या केली जाईल असं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. सध्या या ट्रेनला एकूण २० डब्बे आहेत.

## 'मेट्रो ३' स्थानकाबाहेरील काही वृक्ष उन्मळून पडल्याने पर्यावरणप्रेमींचा संताप

● मुंबई, (राकेश गायकवाड) :

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने ('एमएमआरसीएल') 'कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेतील मेट्रो स्थानक परिसरात २,९३१ झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. या वृक्ष लागवडीसाठी एकूण १२ कोटी १ लाख ६६ हजार १३६ रुपयांची तीन कंत्राटे देण्यात आली आहेत. कंत्राटानुसार प्रत्येक झाडामागे ४१ हजार रुपये खर्च येणार आहे. दरम्यान, 'मेट्रो -३'च्या मरोळ स्थानकाबाहेर केलेल्या वृक्षलागवडीतील काही झाडे उन्मळून पडली असून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. 'मेट्रो -३' मार्गिकेच्या कामासाठी ३३.५ किमीच्या परिसरातील झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करावी लागली होती. झाडांच्या कत्तलीवरून मोठा वादही झाला होता. हा वाद न्यायालयात गेला



आहे. दरम्यान, 'मेट्रो ३'च्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने आतापर्यंत ३,७७२ झाडे हटविण्यास परवानगी दिली आहे. मात्र प्रत्यक्षात ३,०९३ झाडेच हटविल्याची माहिती एमएमआरसीएलकडून देण्यात आली. तर ६७९ झाडे वाचविण्यात एमएमआरसीएलला यश आल्याचेही स्पष्ट केले आहे. यानुसार एमएमआरसीएलच्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत आता 'मेट्रो ३' मार्गिकेतील स्थानक परिसरात २९३१ झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान,उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार 'एमएमआरसीएल' वृक्षारोपण करीत आहे, असे सातत्याने सांगण्यात येत आहे. याच मोहिमेअंतर्गत मरोळ स्थानकाबाहेर लावलेली काही झाडे उन्मळून पडली आहेत. मात्र याकडे कंत्राटदाराचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. 'झाडे लावून ती जगत नाहीत ही गंभीर बाब आहे. तोडण्यात आलेली झाडे कोणत्या प्रजातीची होती याची माहिती घेऊन त्याच प्रजातीची झाडे लावावी. यामुळे ती तग धरून राहतील. तसेच शहराचे पर्यावरण संतुलन चांगले राहील,' असे मत पर्यावरणप्रेमी बी. एन. कुमार यांनी व्यक्त केले. दरम्यान, यासंदर्भात 'एमएमआरसीएल'च्या प्रवक्त्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र प्रतिसाद मिळाला नाही. मेट्रो स्थानक परिसरातील वृक्षारोपणासाठी तीन कंत्राटदरांची नियुक्ती केली आहे. रोपवाटिकांमध्ये ४६ सेंमी परिघापर्यंत झाडांची वाढ करणे, या झाडांचे स्थानक परिसरात रोपण करणे आणि तीन वर्षे झाडांची देखभाल करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर सोपविण्यात आली आहे.

## सप्तश्रृंग गडासाठी जादा बससेवा

● नाशिक, सचिन कदम :



नवरात्रोत्सवानिमित्त साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या कळवण तालुक्यातील सप्तश्रृंग गड येथे देवीच्या दर्शनासाठी पहिल्या दिवसापासून भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने भाविकांसाठी जादा ३०० बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

सप्तश्रृंग गड येथे होणाऱ्या उत्सवासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या प्रमाणावर येतात. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी गुरूवारपासून ते १२ ऑक्टोबर आणि कोजागिरी पौर्णिमा उत्सवासाठी राज्य परिवहनकडून ३०० जादा बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी शहरातील ठक्कर बजार बस स्थानकात व्यवस्था करण्यात आली आहे. नाशिक-दिंडोरी-वणीमार्गे नांदुरी आणि नांदुरी ते सप्तश्रृंग गड याशिवाय मालेगांव आणि मनमाड, सटाणा येथून जादा बससेवा सुरु करण्यात आली आहे. इगतपुरी ते घाटनदेवी अशीही बससेवा सुरू करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त नाशिक-सप्तश्रृंगी गड मार्गावर इलेक्ट्रिक बसच्या ३० फेऱ्या करण्यात येणार आहेत. या बससेवेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.